महाराष्ट्र शासन

# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**४१२/ब, तिसरा मजला, तंत्रशिक्षण मंडळाची नवीन इमारत, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.**

दूरध्वनी क्र. (०२०) २५६५६२३४ Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in

**परिपत्रक :-**

जा. क्र. : तंशिविकापु/शै.वि-३/२०२४/142

दिनांक : /०१/२०२४ 11 JAN 2024

**प्रति,**

प्राचार्य / संचालक,
या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त सर्व स्वायत्त
अभियांत्रिकी अभ्यासक्रमाच्या संस्था (पुणे विभाग)

**विषय : राष्ट्रीय शैक्षणिक धोरण - २०२० च्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने स्वायत्त महाविद्यालयांमधील Best Practices ची Google form मध्ये माहिती भरण्याबाबत**

**संदर्भ** :- १.शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/विशि-३ दि.२६.१२.२०२२२

२. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/ विशि-३/शिकाना दि. २६.०४.२०२३

३. शासन निर्णय उच्च व तंत्रशिक्षण विभाग क्र.एनईपी-२०२२/प्र.क्र.०९/ विशि-३/शिकाना दि.२५.०८.२०२३

४.संचालनालयाचे पत्र क्र.१७/तंशिसं/१२/२०२४ दि.१०.०१.२०२४

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय शासन निर्णयान्वये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० च्या राज्यातील अंमलबजावणीच्या अनुषंगाने गठीत उपसमितीच्या अहवालातील शिफारशींच्या अंमलबजाणीसंदर्भात आढावा घेऊन येणाऱ्या अडचणी निवारण्यासाठी, उपाययोजना सुचविण्यासाठी व मार्गदर्शन करण्यासाठी संदर्भीय शासन निर्णयान्वये सुकाणू समिती गठीत करण्यांत आलेली आहे.

या समितीची पुढील बैठक **दि.३०-३१ जानेवारी २०२४ रोजी सकाळी ११-०० वा चेतना संस्थेच्या हजारीमल सोमाणी महाविद्यालय, बांद्रा(पुर्व) मुंबई** येथे आयोजित करण्यांत आलेली आहे. या अनुषंगाने स्वायत महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय शैक्षणिक धोरण-२०२० अंतर्गत सुरु करण्यांत आलेल्या नवीन अभ्यासक्रमांच्या बाबतीतील **Best Practices** ची माहिती सर्व स्वायत्त महाविद्यालयांनी खाली दिलेल्या **Google form** लिंकवर त्वरीत सादर करावी.

https://forms.gle/JNpeUBPUiNnEnPCs7

सदरची माहिती **दि. ११.०१.२०२४ सायं. ०५-०० वाजेपर्यंत** भरण्यात यावी. तसेच सदरची माहिती सर्व स्वायत्त महाविद्यालयांनी भरणे अनिवार्य आहे.

(मा.रा.जाधव)
प्र.सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत :-१. मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य, मुंबई (कार्यसन क्र. १७) यांना माहितीस्तव